नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधी मालिका अंतर्गत नवीन गोदामांचे बांधकाम, नाबार्ड व्यतिरिक्त इतर नवीन गोदाम बांधकाम व गोदामांसाठी आवश्यक अतिरिक्त कामे व दुरुस्तीची कामे महाराष्ट्र राज्य वखार महामंडळामार्फत करून घेण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांकः गोदाबां-१०२६/प्र.क्र.९४/नापु-१६-ब

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग

मंत्रालय, विस्तार, मुंबई-४०० ०३२

तारीख: २३ नोव्हेंबर, २०२६

संदर्भ :-

१. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक सरंखण विभाग शासन निर्णय क्रमांक गोदाबां-१०२१/प्र.क्र.११०/ना.पु.१६-ब, दि.२६.०८.२०२२

२. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक सरंखण विभाग शासन निर्णय क्रमांक गोदाबां-१०२१/प्र.क्र.११०/ ना.पु.१६-ब, दि.०८.०२.२०२३

३. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक सरंखण विभाग शासन निर्णय क्रमांक गोदाबां-१०२४/प्र.क्र.०२/ ना.पु.१६-ब, दि.२०.०६.२०२४

४. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक सरंखण विभाग शासन परिपत्रक क्रमांक गोदाबां-१०२४/प्र.क्र.०२/ ना.पु.१६-ब, दि.०५.०९.२०२४

प्रस्तावना :-

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अन्नधान्याची सुरक्षित साठवणूक व हाताळणी करण्यासाठी पुरेशा प्रमाणात शासकीय धान्य गोदामांची उपलब्धता असणे आवश्यक आहे. त्याद्दष्टीने राज्यातील शासकीय गोदामांची साठवणूक क्षमता वाढविण्यासाठी सन २०११-१२ पासून नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधी (RIDF) अंतर्गत कर्जस्वरूपात अर्थसहाय्य प्राप्त करून नवीन गोदाम बांधकामांचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यापूर्वी संदर्भ क्र.१ अन्वये नवीन शासकीय धान्य गोदामांची बांधकामे महाराष्ट्र राज्य वखार महामंडळामार्फत करण्यात आलेली आहेत. तथापि, संदर्भ क्र.३ अन्वये पूर्वीचे शासन निर्णय अधिक्रमित करून गोदाम बांधकामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागास "अंमलबजावणी यंत्रणा" म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

२. राज्यात धान खरेदी व धानाच्या भरडाईअंती मोठ्या प्रमाणावर Custom Milled Rice (CMR) प्राप्त होतो. सदर जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी पुरेशा साठवणूक क्षमतेअभावी खरेदी केलेल्या धानाच्या

सुरक्षित साठवणुकीची समस्या निर्माण होत आहे. विशेषतः पावसाळ्यात उघड्यावर साठविलेल्या धानाचे नुकसान होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा जिल्ह्यांमध्ये नवीन गोदामांची बांधकामे प्राधान्याने हाती घेणे आवश्यक आहे.

३. या पार्श्वभूमीवर, नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधी मालिका अंतर्गत नवीन गोदामांचे बांधकाम, नाबार्ड व्यतिरिक्त इतर नवीन गोदाम बांधकाम व गोदामांसाठी आवश्यक अतिरिक्त कामे व दुरुस्तीची कामे महाराष्ट्र राज्य वखार महामंडळामार्फत करून घेण्यासाठी सदर महामंडळास अंमलबजावणी यंत्रणा म्हणून नियुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधी मालिका अंतर्गत नवीन गोदामांचे बांधकाम, नाबार्ड व्यतिरिक्त इतर नवीन गोदाम बांधकाम व गोदामांसाठी आवश्यक अतिरिक्त कामे व दुरुस्तीची कामे याकरिता या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे यांची अंमलबजावणी यंत्रणा (Implementing Agency) व ज्ञान भागीदार (Knowledge Partner) म्हणून नियुक्ती करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. या शासन निर्णयान्वये संदर्भ क्र.३ चा दि.२०.०६.२०२४ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र राज्य वखार महामंडळामार्फत नवीन शासकीय धान्य गोदामांची बांधकामे करून घेण्याबाबतची कार्यपद्धती पुढीलप्रमाणे राहील:-

I. **मुख्य समन्वय अधिकारी** :- सदर गोदाम बांधकामांसाठी महाव्यवस्थापक (अभियांत्रिकी), महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे हे "मुख्य समन्वय अधिकारी (प्रशासकीय/तांत्रिक)" म्हणून काम पाहतील.

II. **जागेची उपलब्धता व आवश्यक परवानग्या** :- संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी जिल्ह्यातील साठवणूक क्षमतेची आवश्यकता विचारात घेऊन प्रस्तावित गोदाम बांधकामासाठी आवश्यक जागेची उपलब्धता सुनिश्चित करावी. तसेच, सदर ठिकाणी गोदाम बांधकामाची आवश्यकता असल्याबाबत जिल्हाधिकारी यांची मान्यता घेऊन, प्रस्तावित गोदामाचे ठिकाण, आवश्यक साठवणूक क्षमता व उपलब्ध जागेचा तपशील यांसह गोदाम बांधकामाचा मागणी प्रस्ताव शासनास सादर करावा. अशा प्रकारे प्राप्त मागणी प्रस्तावांच्या अनुषंगाने शासनस्तरावर आवश्यकतेची छाननी करून महाराष्ट्र राज्य वखार महामंडळामार्फत संबंधित गोदामांचे सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) व अंदाजपत्रके तयार करून घेण्यात येतील.

III. **गोदाम बांधकाम प्रस्ताव व अंदाजपत्रके**:- शासनाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाने नवीन गोदाम बांधकामाचे सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) व अंदाजपत्रके तयार

करावीत. सदर अंदाजपत्रके तयार करताना महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाची प्रचलित मानक कार्यपद्धती (Standard Operating Procedure - SOP), भारतीय अन्न महामंडळाची (FCI) लागू असलेली बांधकाम मानके तसेच, एकसमान क्षमतेच्या गोदामांसाठी समान तांत्रिक निकष व बांधकाम मानकांचा अवलंब करण्यात यावा. त्यानंतर सविस्तर प्रकल्प अहवाल व अंदाजपत्रकांसह प्रस्ताव मान्यतेसाठी शासनास सादर करावेत.

IV. **प्रस्तावांची छाननी व प्रशासकीय मान्यता** :- महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाकडून प्राप्त गोदाम बांधकाम प्रस्तावांची छाननी करून, संबंधित प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत शासनस्तरावर निर्णय घेण्यात येईल.

V. **नाबार्डच्या RIDF अंतर्गत समावेश** :- नवीन गोदाम बांधकामांच्या प्रस्तावांना सक्षम प्राधिकाऱ्याची प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर, नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधी (RIDF) मालिकेंतर्गत समावेश करण्यासाठी संबंधित प्रस्ताव शासनस्तरावरून नाबार्डकडे सादर करण्यात येतील. सदर प्रस्तावांचा नाबार्डच्या RIDF अंतर्गत समावेश व कर्जस्वरूपातील अर्थसहाय्य हे नाबार्डच्या लागू निकष व मान्यतेच्या अधीन राहील.

VI. **निधी वितरण :-** प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर व आवश्यक निधी उपलब्ध झाल्यावर शासनस्तरावरून निधी वितरणाचे आदेश निर्गमित करण्यात येतील. तद्नंतर वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांच्यामार्फत विहित वित्तीय कार्यपद्धतीनुसार संबंधित कामांसाठी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळास त्यांनी या योजनेसाठी उघडलेल्या स्वतंत्र खात्यात निधी वर्ग करण्यात येईल. महामंडळाने प्राप्त निधीचा विनियोग संबंधित मंजूर कामांसाठीच करावा. तसेच प्राप्त निधी, खर्च व शिल्लक रकमेचा स्वतंत्र प्रकल्पनिहाय हिशेब ठेवावा.

VII. **मासिक प्रगती अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र :-** महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाने गोदाम बांधकामांच्या प्रगतीबाबत मासिक प्रगती अहवाल (Monthly Progress Report) तसेच खर्च केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) शासनास नियमितपणे सादर करावीत.

VIII. **आधुनिक व शास्त्रोक्त गोदाम बांधकाम** :- सदर गोदामांची बांधकामे आधुनिक, शास्त्रोक्त व किफायतशीर पद्धतीने करण्यात यावीत. बांधकामासाठी आवश्यक गुणवत्ता नियंत्रण, संरचनात्मक सुरक्षितता व धान्याच्या सुरक्षित साठवणुकीच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजनांचे पालन करण्यात यावे.

IX. **देखभाल व दुरुस्ती** :- महाराष्ट्र राज्य वखार महामंडळामार्फत नव्याने बांधण्यात आलेल्या तसेच राज्यात सध्या अस्तित्वात असलेल्या शासकीय धान्य गोदामांची आवश्यक अतिरिक्त गोदाम बांधकामे व दुरुस्तीची कामे महाराष्ट्र राज्य वखार महामंडळामार्फतच करण्यात यावीत.

याकरिता संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी दुरुस्ती आवश्यक असलेल्या गोदामांची प्रत्यक्ष पाहणी करून दुरुस्तीच्या कामांची आवश्यकता, स्वरूप व सद्यस्थिती याबाबतचा सविस्तर प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने शासनास सादर करावा. शासनाकडे प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने आवश्यकतेची छाननी करून महाराष्ट्र राज्य वखार महामंडळामार्फत संबंधित गोदामांच्या दुरुस्तीच्या कामांची अंदाजपत्रके तयार करून घेण्यात येतील. महामंडळाने आवश्यक तांत्रिक मान्यता प्रदान करून अंदाजपत्रकांसह प्रस्ताव शासनास सादर करावा. त्यानंतर सदर प्रस्तावांची शासनस्तरावर छाननी करून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

X. **गोदामांचे हस्तांतरण :-** नवीन गोदामांचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर आवश्यक पूर्णत्व प्रमाणपत्र प्राप्त झाल्यापासून ९० दिवसांच्या आत संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी गोदामाचा ताबा घेण्याची कार्यवाही करावी.

XI. **प्रकल्प पूर्णत्व प्रमाणपत्र व अहवाल** :- गोदाम बांधकाम पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाने Project Completion Certificate (PCC) व Project Completion Report (PCR) संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्यामार्फत शासनास सादर करावेत. नाबार्डच्या निधीतून होणाऱ्या कामांचे आवश्यक अहवाल नाबार्डकडे सादर करण्याची कार्यवाही विहित कालावधीत पूर्ण करण्यात यावी.

३. गोदाम बांधकामासाठी आवश्यक सुविधा व मार्गदर्शक सूचनांचे पालन :- सदर शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य वखार महामंडळामार्फत हाती घेण्यात येणाऱ्या गोदाम बांधकामांसाठी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाची प्रचलित मानक कार्यपद्धती (Standard Operating Procedure - SOP) , भारतीय अन्न महामंडळाची (FCI) लागू असलेली गोदाम बांधकामविषयक मानके तसेच वखार विकास व नियामक प्राधिकरण (Warehousing Development and Regulatory Authority-WRDA) यांच्या गोदाम बांधकामविषयक मार्गदर्शक सूचना विचारात घ्याव्यात. विशेषतः खालील बाबींची दक्षता घेण्यात यावी :-

i. नवीन गोदामांच्या बांधकामासाठी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाने निश्चित केलेली मानके आणि PEB (Pre-Engineered Building) बांधकाम पद्धती विचारात घ्यावी.

ii. गोदामाच्या जागेची परिस्थिती व तांत्रिक आवश्यकता विचारात घेऊन पाया, भिंती, छत व इतर संरचनात्मक बाबी निश्चित कराव्यात.

iii. गोदामाच्या क्षमतेनुसार कार्यालयीन कक्ष, सुरक्षा कक्ष व पुरुष आणि महिलांसाठी आवश्यक स्वच्छतागृहांची व्यवस्था करण्यात यावी.

iv. गोदामाच्या परिसरात आवश्यक अंतर्गत रस्ते, संरक्षक भिंत, पाणीपुरवठा, विद्युत व्यवस्था व अग्निप्रतिबंधक उपाययोजनांचा समावेश करण्यात यावा.

v. धान्याच्या सुरक्षित साठवणुकीसाठी आवश्यक वायुवीजन, योग्य उंची, धान्य चढ-उताराची सुविधा व इतर आवश्यक बाबींची तरतूद करावी.

vi. संबंधित जागेच्या आवश्यकतेनुसार पावसाच्या पाण्याचा निचरा, पर्जन्यजल संधारण तसेच लागू नियमांनुसार इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

vii. बांधकामाची गुणवत्ता व खर्च यांचा विचार करून नवीन गोदामांच्या अंदाजपत्रकांमध्ये सर्व आवश्यक बाबींचा सुरुवातीलाच समावेश करण्यात यावा. जेणेकरून बांधकाम पूर्ण झाल्यानंतर अतिरिक्त कामांची आवश्यकता पडणार नाही.

४. यापूर्वी शासनाकडून नवीन शासकीय धान्य गोदामांच्या बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या कामांपैकी, ज्या कामांचे कार्यारंभ आदेश निर्गमित झालेले नाहीत, ज्या कामांसाठी शासनाकडून निधी उपलब्ध करून देण्यात आलेला नाही तसेच ज्या कामांची प्रत्यक्ष सुरुवात झालेली नाही, अशी सर्व कामे या शासन निर्णयान्वये रद्द झालेली समजण्यात यावीत. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरू असलेली कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फतच पूर्ण करण्यात यावीत.

५. महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाने प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या गोदाम बांधकामांसाठी कामनिहाय कालबद्ध कार्यक्रम निश्चित करावा. सदर बांधकामे विहित कालावधीत पूर्ण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी. बांधकामांची प्रगती, खर्च, गुणवत्ता व कालमर्यादा याबाबत मुख्य समन्वय अधिकारी यांनी नियमित आढावा घ्यावा. तसेच आवश्यकतेनुसार शासनस्तरावर प्रगती अहवाल सादर करावा. नाबार्डच्या कर्जस्वरूपात प्राप्त होणाऱ्या अर्थसहाय्यातून होणाऱ्या कामांच्या बाबतीत विहित कालावधीत प्रतिपुर्ती दावे, प्रगती अहवाल व प्रकल्प पूर्णत्व अहवाल सादर करण्याची जबाबदारी संबंधित अंमलबजावणी यंत्रणा व जिल्हा पुरवठा अधिकारी यांची राहील.

६ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत असून त्याचा संकेतांक २०२६११२३१७३९४८१५०६ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIKAS MOHAN RAUT

Digitally signed by VIKAS MOHAN RAUT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FOOD CIVIL SUPPLY AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT, 2.5.4.20=2257bfd826714a9a0f6fe86e455cfabd6b353b41a3dcde19df1c89749d0de4d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=65D403E0F9767CEEA21CB169A8A5475E77BE535DEEEF3CF5809A87BF3A020F2F, cn=VIKAS MOHAN RAUT
Date: 2026.11.23 17:41:33 +05'30'

(विकास राऊत)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.

२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३. मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव.
४. मा. राज्यमंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव
५. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव.
६. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे स्वीय सहायक.
१०. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे.
११. वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
१२. सर्व विभागीय आयुक्त.
१३. सर्व जिल्हाधिकारी.
१४. सर्व उपआयुक्त (पुरवठा).
१५. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी.
१६. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सर्व प्रादेशिक विभाग.
१७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१ व २.
१८. सर्व संबंधित सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.
१९. निवडनस्ती/नापु-१६-ब.